वर्ष-०९ अंक-५१ मुंबई, मंगळवार, १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२३ पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक
POLICE BATMI PATRA

PG 2 हार्मोन्स नियंत्रणात ठेवण्यासाठी धण्याचे पाणी कसे प्यावे
3 → अलौकिक पराक्रमाचे स्मरण
मजुराच्या अवयवदानातून एकाला जीवदान; दोघांना मिळणार दृष्टी ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

# उद्धव ठाकरे पुन्हा भाजपसोबत येणार ?
## भाजपच्या बड्या नेत्याचं विधान काय ?

**मुंबई। प्रतिनिधी,**

देशभरात दिवाळी जल्लोषात साजरी केली जात आहे. फटाके फोडून सर्वचजण आनंद लुटताना दिसत आहेत. तसेच तर राजकारणातही फटाके फुटताना दिसत आहे. सर्वत्र दिवाळीचा जल्लोष सुरू असतानाच भाजपचे नेते, आमदार प्रसाद लाड यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि भाजप एकत्र येण्याबाबतच्या चर्चांवर भाष्य करून राजकीय सुरसुरी सोडली आहे. त्यामुळे राजकीय वतुर्ळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आलं असून आगामी काही दिवस राज्याचं राजकारण या चर्चे भोवती फिरण्याची शक्यताही दिसत आहे. आमदार प्रसाद लाड यांनी मीडियाशी संवाद साधताना मोठं भाष्य केलं.राजकारणात कधीही काहीही होऊ शकतं. पण ज्या पद्धतीने उद्धव ठाकरे यांनी भाजप बद्दल वक्तव्य केली, त्यामुळे भाजप परत कधी उद्धव ठाकरेंना सोबत घेईल, असं मला वाटत नाही, असं प्रसाद लाड यांनी म्हटलं आहे. त्यामुळे भाजपने उद्धव ठाकरे यांच्यासोबत कधीही युती न करण्याचा निर्णय घेतलाय का? अशी चर्चा या निमित्ताने केली जात आहे. उद्धव ठाकरे हे ठाण्यात, ठाणेकरांची दिवाळी खराब करण्यासाठी गेले होते. काळे झेंडे दाखवले तेव्हा हे सगळे पळून गेले. दिवाळीतला फुसका बार निघाला, अशी टीकाच त्यांनी केली.

**तारतम्य बाळगा**

यावेळी त्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या विधानांवरही भाष्य केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः आरक्षण देणार असल्याचं सांगितलं आहे. त्यामुळे दिलेल्या तारखेपर्यंत तरी मनोज जरांगे यांनी शांत राहिलं पाहिजे. बंधू म्हणून माझी त्यांना विनंती आहे. राजकीय स्टंट करू नका. मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागलेला आहे. मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला आहे. त्यामुळे वातावरण बिघडवण्याचं काम करू नका. दिवाळीच्या दिवशी अशी विधाने करून वातावरण खराब होतं. राज्याचं वातावरण खराब होतं. म्हणून त्यांना विनंती आहे की त्यांनी अशी भाषा वापरू नये. बोलताना तारत्मय बाळगावा; असा सल्लाही लाड यांनी जरांगे पाटील यांना दिला आहे.

**करताकरविता बारामतीत**

यावेळी त्यांनी ठाकरे गटाचे नेते अरविंद सावंत यांच्यावर टीका केली. त्यांना आम्हाला बोलण्याचा काहीच अधिकार नाही. त्यांचा मालक अडीच वर्ष घरात बसून होता. त्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना प्रश्न विचारला पाहिजे. काँग्रेसमध्ये सहा ते सात मुख्यमंत्री होऊन गेले, त्यांना आरक्षणावर विचारावं. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना आरक्षण दिलं होतं. ते हायकोर्टात टिकलं. सर्वोच्च न्यायालयात टिकलं नाही. उद्धव ठाकरेही मुख्यमंत्री होते. त्यांना कुणी प्रश्न विचारत नाही. यामागचा करताकरविता बारामतीतला आहे, असा दावाही त्यांनी केला.



**आकर्षक रोषणाई...**

प्रसाद लाड यांच्या घरी दिवाळीनिमित्त विशेष रोषणाई करण्यात आली आहे. घरात अयोध्येची प्रतिकृती करण्यात आली आहे. त्यावरही त्यांनी भाष्य केलं. ही दिवाळी आमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. प्रभू रामचंद्र दिवाळीतच वनवास संपवून घरी आले होते. त्यामुळे हिंदू म्हणून आमच्यासाठी हा दिवस अभिमानाचा आहे. म्हणूनच आम्ही प्रभू रामचंद्राची प्रतिमा घरात विराजमान केली आहे, असं लाड म्हणाले.




# 'एकनाथ शिंदेंची अंतर्वस्त्र पाहिली तर...', संजय राऊतांची बोचरी टीका

**मुंबई । प्रतिनिधी,**

एकनाथ शिंदेंची अंतर्वस्त्र पाहिली तर कळेल, त्यांनी फुल पँटमध्ये त्यांनी आतमध्ये खाकी हाफ चड्डी घालायला सुरुवात केली आहे आणि त्याआत कमलाची अंडरवियर आहे, अशी बोचरी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. दिवाळीमुळे आम्ही संयम राखला, यांचे उपकार त्यांनी मानले पाहिजेत, असेही संजय राऊत आज माध्यमांशी बोलताना म्हणाले. लोकसभा झाल्यानंतर शिंदे-अजित पवार गट असेल हे सर्वजण भाजपमध्ये जाणार आहेत, या प्रश्नावर संजय राऊत म्हणाले, ते आताच भाजपमध्ये आहेत ना. तेव्हा कशाला जायाला पाहिजे. तुम्ही त्यांची अंतर्वस्त्र पाहिलीत तर त्याच्यावर कमळच आहे. शिंदेंनी फुल पँटच्या आतमध्ये खाकी हाफ चड्डी आताच घालायला सुरुवात केली आहे आणि आतमध्ये कमळाची अंडरवियर आहे. तुम्ही जर कधी गेलात तर त्यांना दाखवायला सांगा. त्याशिवाय ते मुख्यमंत्री आणि मंत्रीपदी राहू शकत नाही. नंतर कशाला जायला पाहिजे. ते आताच गेले आहेत. आताच ते गुलाम झाले आहेत आणि गुलामाना स्वताःचे मत आणि स्वाभिमान नसतो, अशी बोचरी टीका त्यांनी मुख्यमंत्र्यांवर केली आहे.

मुंब्र्याच्या शाखा भेटीसंदर्भात संजय राऊत म्हणाले, मराठी माणसाची बेआबरू केली आहे. त्यांनी शिवसेनेला ज्ञान देण्याचा प्रयत्न करू नये. मुंब्राल्या आम्ही गेलो, तेव्हा हजारो शिवसैनिक रस्त्यावर उतरले होते. पोलिसांनी आम्हाला थांबवण्याचा प्रयत्न केल्यामुळे नक्की संघर्ष टाळला. तुमच्याकडे सत्ता आणि पोलीस नसते, तर चित्र वेळे दिसले असते. दिवाळीमुळे आम्ही संयम राखला, यांचे उपकार त्यांनी मानले पाहिजेत, अशी टीका त्यांनी शिंदे गटावर केली.

महाराष्ट्रानंतर बिहारमध्ये तेजस्वी यादव यांना ईडीच्या जाळ्यात अडकवले जात आहे, या प्रश्नावर संजय राऊत म्हणाले, भाजपच्या मनात पराभवाची भीती आहे. जे विरोधी आहेत त्यांना काम न करून देणे, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, राजस्थान आणि छत्तीसगढमध्ये ईडीचे सत्र सुरू आहे. जिथे जिथे भाजपचे सरकार नाही. जिथे भाजप 2024 मध्ये सत्तेत येण्यासाठी हे सर्व करत आहे. पण लालू प्रसाद यादव आणि त्यांचे कुटुंब हे खूप मजबूत आहे.




महाराष्ट्र युनियन ऑफ jarnalist चे कोकण विभाग सरचिटणीस श्री सुधाकर गंगाराम दळवी यांचा महाराष्ट्र क्राईम टाइम्स चे संपादक श्री राकेश शंकर गोरे यांनी केला सत्कार महारष्ट्र राज्यातील विविध पत्र करांच्या हिता साठी अथवा विविध मागण्यांसाठी अहोरात्र परिश्रम करून नेहमी झटणारे व पत्र करांना नेहमी न्याय व हक्क मीलाऊन देणारे महाराष्ट्र युनियन ऑफ jarnalist चे कोकण विभाग सर चिटणीस श्री सुधाकर गंगाराम दळवी यांचा श्री राकेश शंकर गोरे महारष्ट्र क्राईम टाइम्स चे संपादक यांनी पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. तळागाळातील पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एकमेव युनियन चे अध्यक्ष दीपक मोरेश्वर नाईक. उपाध्यक्ष प्रशांत वाघमारे. सचिव विनोद दशरथ मेढे. तसेच युनियन मध्ये अनेक दिग्गज पत्रकार व संपादक या युनियन मध्ये कार्यरत आहेत.



# काय आहे दिवाळी सणाचे महत्व?

दिवाळी किंवा दीपावली हा एक प्रमुख हिंदू सण आहे. हा दीपोत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. या सणाला घरात व घराबाहेर तेलाचे लहान दिवे लावले जातात. उंच जागी आकाशदिवा (आकाशकंदिल) लावला जातो.

घराबाहेर रांगोळी काढून सुशोभन केले जाते. पावसाळा संपून नवीन पिके हाती आल्यानंतर शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी, आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकालात हा सण येतो. आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध प्रतिपदा हे चार दिवस या सणाचे असतात. हा सण साधारणपणे ऑक्टोबर - नोव्हेंबर दरम्यान येत असतो. या सणाला भारतात बव्हंश ठिकाणी सुटी असते.

उपलब्ध पुराव्यांनुसार दिवाळी हा सण किमान तीन हजार वर्षे जुना आहे. या सणाचा उगम फार प्राचीन काळी आर्यांचे वास्तव्य उत्तर ध्रुव प्रदेशात होते, त्या काळातच झाला असा समज आहे. सहा महिन्यांची प्रदीर्घ रात्र संपून सहा महिन्यांचा दिवस सुरु होताच त्या प्रदेशातील लोकांना नवजीवन प्राप्त झाल्यासारखे वाटत असावे आणि त्यासाठीच ते हा आनंदोत्सव करीत असावेत. तथापि वैदिक काळात आश्विन महिन्यात शरद ऋतूचे औचित्य साधून आश्वयुजी किंवा आग्रयण यासारखे यज्ञ केले जात असत ज्यांचा समावेश सात पाकयज्ञ यामध्ये होतो.परंतु या धार्मिक आचारात दिवाळीचे प्राचीन संदर्भ सापडतात असे नेमके म्हणता येतेच असे नाही असे मत बी. के. गुप्ते यांनी आपल्या फोकलोअर ऑफ दिवाली या पुस्तकात मांडले आहे.

काही लोकांची अशी श्रद्धा आहे की चौदा वर्षांचा वनवास संपवून रामचंद्र सीतेसह अयोध्येला परत आला, तो याच दिवसात. पण त्या वेळी त्याचे स्वरूप आजच्यापेक्षा खूपच भिन्न होते. प्राचीन काळी हा यक्षांचा उत्सव मानला जायचा. अंधार दूर करुन प्रकाशाचे अस्तित्व निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतीक मानला जातो. याच्या प्रकाशाने आपल्या जीवनातील अंधकार दूर व्हावा म्हणून हा दीपोत्सव साजरा केला जातो. पावसाळ्यातील समृद्धीच्या, आनंद उत्सवाचा, कृतज्ञतेचा हा सोहळा मानला जातो. या दिवसांत सायंकाळी दारात रांगोळ्या काढून पणत्या लावतात, घरांच्या दारात आकाशदिवे लावले जातात. महाराष्ट्रात व इतर ठिकाणी लहान मुले या काळात मातीचा किल्ला तयार करतात. त्यावर मातीची खेळणी मांडतात. धान्य पेरतात. यामागची परंपरा कशी व केंव्हा सुरु झाली याची नोंद नाही.

### वसुबारस

आश्विन कृष्ण द्वादशीस, म्हणजेच गोवत्सद्वादशीस, वसुबारस हा सण साजरा केला जातो. वसुबारस ह्याचा अर्थ-वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. भारताची संस्कृती कृषिप्रधान असल्याने या दिवसाचे महत्त्व विशेष आहे.या दिवशी संध्याकाळी गाईची पाडसासह पूजा करतात. घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत त्यांच्याकडे ह्या दिवशी पुरणाचा स्वयंपाक करतात. घरातील सवाष्ण बायका गाईच्या पायावर पाणी घालतात. नंतर हळद-कुंकू, फुले, अक्षता वाहून फुलांची माळ त्यांच्या गळ्यात घालतात. निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढून गाईला खाऊ घालतात. ह्या दिवसापासून अंगणात रांगोळी काढण्यास सुरुवात करतात. पुष्कळ स्त्रियांचा या दिवशी उपवास असतो. ह्या दिवशी गहू, मूग खात नाहीत. स्त्रिया बाजरीची भाकरी व गवारीच्या शेंगाची भाजी खाऊन उपवास सोडतात. आपल्या मुला-बाळांना चांगले आरोग्य मिळावे व सुख लाभावे म्हणून ही पूजा करतात.

### धनत्रयोदशी

आश्विन कृष्ण त्रयोदशीस धनत्रयोदशी हा सण साजरा केला जातो. धनत्रयोदशी या सणामागे एक मनोवेधक कथा आहे. कथित भविष्यवाणीप्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपला पुत्राने जीवनाची सर्व सुखे उपभोगावीत म्हणून राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चौथा दिवस हा तो मृत्युमुखी पडण्याचा दिवस असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या-चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वारही असेच सोन्या चांदीने भरून रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून पत्नी त्याला जागे ठेवते. जेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परूपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे डोळे सोन्या -चांदीने दिपतात. या कारणास्तव यम आपल्या जगात (यमलोकात) परततो. अशा प्रकारे राजकुमाराचे प्राण वाचतात अशी आख्यायिका प्रचलित आहे. म्हणूनच या दिवसास यमदीपदान असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यू टळतो असा समज आहे.

धनत्रयोदशीबद्दल अजून एक दंतकथा आहे. ती म्हणजे समुद्र मंथन. जेव्हा असुरांबरोबर इंद्रदेव यांनी महर्षि दुर्वास यांच्या शाप निवारणाकरिता समुद्र मंथन केले, तेव्हा त्यातून देवी लक्ष्मी प्रगट झाली.तसेच समुद्र मंथनातून धन्वंतरी अमृतकुंभ बाहेर घेऊन आला. म्हणून धन्वंतरीचीही या दिवशी पूजा केली जाते. धन्वंतरी हा वैद्यराज असून त्याच्या हातातील कमंडलू अमृताने भरलेला असतो असे म्हटले आहे. त्या दिवसास ''धन्वंतरी जयंती'' असेही म्हणतात. आयुर्वेदाच्या दृष्टीने हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. प्रसादास कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे. धन्वंतरी हा अमृतत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. कडुनिंबाची पाच-सहा पाने जर रोज खाल्ली तर व्याधी होण्याचा संभव नाही, असे काहीजणांची समजूत आहे. कडुनिंबाचे एवढे महत्त्व आहे, म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

### नरक चतुर्दशी

नरक चतुर्दशी या सणाशी संबंधित नरकासुरवधाची आख्यायिका प्रचलित आहे. या दिवशी कृष्णाने नरकासुराचा वध करून प्रजेला त्याच्या जुलुमी राजवटीतून सोडवले. नरकासुराने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व अवध्यत्वाचा - म्हणजेच कुणाकडूनही वध होणार नाही - असा वर मागून घेतला. त्या वराच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले व मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. त्याने अगणित संपत्ती लुटली व अश्याच हावेपोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले व वरुणाचे विशाल छत्रही बळकावले. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व व मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती. ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी, अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. या दुर्जय राजधानीवर कृष्णाने गरुडावर स्वार होऊन चाल केली.

कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुरवधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो. नरकचतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे पहाटे मर्दन करून आपल्यातील नरकरूपी पापवासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे.तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्मज्योत प्रकाशित होईल असा यामागील संकेत आहे. या दिवशी अभ्यंगस्नानाचे महत्त्व असते. सकाळी लवकर उठून, संपूर्ण शरीरास तेलाचे मर्दन करून, सुवासिक उटणे लावून, सूर्योदयापूर्वी केलेले स्नान म्हणजे अभ्यंगस्नान. या दिवशी पहाटे यमासाठी नरकात म्हणजे आधुनिक परिभाषेत घरातील स्वच्छतागृहात दीपदान करण्याची (पणती लावण्याची) प्रथा आहे असे मानले जाते. वर्षक्रियाकौमुदी, धर्मसिंधु इ. ग्रंथांमध्ये सांगितले आहे की आश्विन कृष्ण चतुर्दशी आणि अमावास्येला संध्याकाळी लोकांनी आपल्या हातात मशाली घेवून त्या आपल्या दिवंगत पूर्वजांसाठी दाखवाव्यात आणि प्रार्थना करावी.

### लक्ष्मीपूजन

आश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन हा सण साजरा केला जातो.या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते.लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे.त्यामुळे, शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात. त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात. या दिवशी स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात. प्राचीन काळी या रात्री कुबेरपूजन करण्याची रीत होती. कुबेर हा शिवाचा खजिनदार आणि धनसंपत्तीचा स्वामी मानला जातो. दीपप्रज्वलन करून यक्ष आणि त्यांचा अधिपती कुबेराला निमंत्रित करुन पूजणे हा मूळचा सांस्कृतिक कार्यक्रम होता. परंतु गुप्तकाळात वैष्णव पंथाला राजाश्रय मिळाल्याने आधी कुबेराबरोबरच लक्ष्मीचीही पूजा होऊ लागली. विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात कुशाण काळातील अनेक मूर्ती सापडल्या आहेत. त्यांमध्ये कुबेर आणि लक्ष्मी एकत्र दर्शविले आहेत. काही मूर्तींमध्ये कुबेर त्याची पत्नी इरितीसह दाखविला आहे. यावरून असे दिसते की प्राचीन काळी कुबेर आणि त्यांची पत्नी इरिती यांची पूजा केली जात असावी. कालांतराने इरितीचे स्थान लक्ष्मीने घेतले आणि पुढे कुबेराच्या जागी गणपतीला प्रतिष्ठित केले गेले. अलक्ष्मी म्हणून ज्या देवतेला मध्यरात्री हाकलून देण्याची प्रथा आहे, तीच खरी या सणाची इष्ट देवता असल्याचेही म्हटले जाते. तिला ज्येष्ठा, षष्टी वा सटवी, निर्ऋती या नावांनीही ओळखतात. निर्ऋती ही सिंधू-संस्कृतीतील मातृदेवता समजली जाते. तिला ब्राह्मणी संस्कृतीने अलक्ष्मी म्हणून तिरस्कारले असले तरी ती राक्षसांची लक्ष्मी आहे असे देव मानत असल्याचे उल्लेख दुर्गासप्तशतीमध्ये आहेत.

लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने 'आर्थिक व्यवहारातील सचोटी व नीती' आणि 'अर्थप्राप्तीच्या साधनांविषयी कृतज्ञता' अशी दोन महत्त्वाची मूल्ये मनात रुजतात, म्हणून या पूजेची विशेषता आहे. भगवान महावीर मोक्षाला गेल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी महावीरांचे प्रमुख शिष्य गौतम गणधर यांना केवल ज्ञान प्राप्त झाले म्हणूनच दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मीपूजन केले जाते ते संपत्तीरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी नव्हे, तर मोक्ष-लक्ष्मी किंवा आत्मकल्याणरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी. गणधर त्यांचा दिव्य-ध्वनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवितात. दिवाळीसाठी पूर्वी जमिनीवर आणि राजस्थानातील प्रथेप्रमाणे तांदळाच्या ओल्या पिठाची रांगोळी काढतात. त्याला 'मांडणे' असे म्हणतात. त्यावर पाट मांडून लक्ष्मीपूजन किंवा ओवाळणे आदी विधी केले जातात.

### गोवर्धन पूजा

मथुरेकडील लोक बलिप्रतिपदेच्या दिवशी सकाळी गोवर्धन पर्वताची पूजा करतात. ते ज्यांना शक्य नसेल ते गोवर्धनाची प्रतिकृती करून त्याची पूजा करतात. अन्नकूट म्हणजे वास्तवात गोवर्धनाची पूजा होय.प्राचीन काळी हा उत्सव इंद्राप्रीत्यर्थ होत असे.पण वैष्णव संप्रदाय बलवान झाल्यावर इंद्पूजेचे रूपांतर गोवर्धनपूजेत केले जाते.विविध प्रकारची पक्वान्ने आणि खाद्य पदार्थ तयार करून ते कृष्ण मूर्तीच्या पुढे मांडणे व कृष्णाला त्याचा नैवेद्य दाखविणे याला अन्नकूट म्हणतात.

### भाऊबीज

कार्तिक शुद्ध द्वितीयेस भाऊबीज हा सण साजरा केला जातो.या दिवशी यम आपली बहीण यमी हिच्या घरी जेवायला गेला म्हणून या दिवसाला ''यमद्वितीया'' असे नाव मिळाले असे मानले जाते. हा दिवस म्हणजे शरद ऋतूतील कार्तिक मासातील द्वितीया. द्वितीयेचा चंद्र आकर्षक व वर्धमानता दाखवणारा आहे. तेव्हा 'बीजेच्या कोरीप्रमाणे बंधुप्रेमाचे वर्धन होत राहो, ही त्यामागची भूमिका आहे.' आपल्या मनातील द्वेष व असूया निघाल्यामुळे सर्वत्र बंधुभावनेची कल्पना जागृत होते; म्हणून त्याकरिता हा भाऊबीजेच्या सण आहे. बंधु-भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा हा दिवस आहे. या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात 'ओवाळणी' देऊन बहिणीचा सत्कार करतो. भावा-बहिणीच्या नात्याचा एक तरी सण प्रत्येक समाजात असतोच. राजस्थान, उत्तरेकडे राखी पौर्णिमेला महत्त्व आहे. इकडे आलेल्या जैन समाजातील काहींनी तीच परंपरा कायम ठेवली. काहींनी मात्र इथल्या रीती-रिवाजाप्रमाणे भाऊबीज साजरी करण्यास सुरुवात केली. त्यातही जैन लोकांच्या काही विशिष्ट समाजांत फक्त भावाकडूनच ओवाळणी 'वसूल' केली जात नाही तर बहीणही भावाला आणि भाऊ विवाहित असेल तर वहिनीलाही भेटवस्तू देत असते. मराठवाड्यातील किंबहुना महाराष्ट्रातील दिवाळी शेतीभातीशी जोडलेली आहे.

१.दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी, गायी
म्हशी कोणाच्या, लक्ष्मणाच्या ...
२.दिवाळी दिवाळी आन्धुलीची जल्दी करा
आज मारील नरकासुरा, किसन देव
३.गाई म्हशीने भरले वाडे दह्या दुधानं भरले
डेरे, बळीच राज्य येवो.

अशा ओव्यातून वा गाण्यातून दिवाळीचे प्रतिबिंब दिसते.

---

## वसई विरार शहर महानगरपालिका
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
**मुख्य कार्यालय - विरार**
**दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३**

**जावक क्र. वविशम /कवि/२३४२/२०२३-२४**
**दिनांक झ०७/११/२०२३**

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संर्दभाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज-1 | NL01/137/11 | 4031 | राजाराम सखाराम जाधव | बैद्यनाथ महादेव पाल व गीताश्री बैद्यनाथ पाल |
| 2 | तुळींज-7 | NL07/218/24 | 4035 | विश्वास भाऊ धनावडे | दिपक शंकर वाजे व निलम दिपक वाजे |
| 3 | तुळींज-2 | NL02/704/1 | 4037 | संजय लक्ष्मण पाटील | शिव कुमारी शर्मा नाई |
| 4 | तुळींज-7 | NL07/480/31 | 4039 | शिला रामनायक विश्वकर्मा | ज्योती जयवंत निमाले |
| 5 | तुळींज-4 | NL04/416/45 | 4040 | पांडुरंग सावळा जाधव | विठाबाई संजय कदम |
| 6 | तुळींज-4 | NL04/386/22 | 4042 | व्ही जे बिल्डर्स आणि डेव्ह. | मनिषा सचिन पालकर |
| 7 | तुळींज-3 | NL03/88/3 | 4045 | पी.जी. सपके | नलीनी पुरुशोत्तम सपके |
| 8 | तुळींज-7 | NL07/12/8 | 4051 | मधुकर गो मोडक व संगीता म मोडक | दिनेश मोतीलाल जैन व हिराबाई मोतीलाल जैन |
| 9 | तुळींज-2 | NL02/990/2 | 4053 | कुमारी राजेश गुप्ता | राजेश मारकंडे गुप्ता |
| 10 | तुळींज-3 | NL03/783/5 | 4056 | राणाप्रताप राजेंन्द्र यादव | मीरा चंद्रजीत प्रजापती |
| 11 | तुळींज-7 | NL07/519/5 | 4059 | शाम्स प्लाझा | रेखा रामा यादव |
| 12 | तुळींज-6 | NL06/67/6 | 4061 | मेहुल भिखाभाई चौहान | संगीता अजय कनोजिया व अजयकुमार फुलचंद्र कनोजिया |
| 13 | तुळींज-3 | NL03/453/38 | 4063 | कविता बा. सावंत | श्रध्दा दिपक मालप |
| 14 | तुळींज-4 | NL04/318/15 | 4067 | उत्तम जि. मंडळ | संध्या उत्तम मंडल |
| 15 | तुळींज-2 | NL02/675/54 | 4069 | मनीब जनकधारी गुप्ता | पियाली प्रविर पाल व प्रविर काशिनाथ पाल |
| 16 | तुळींज-1 | NL01/140/36 | 4071 | बिबुती दास | सुनील उमाजी राणे |
| 17 | तुळींज-7 | NL07/462/18 | 4073 | भानुबेन प्रविणभाई परमार | भारती अशोक लोटेकर |
| 18 | तुळींज-2 | NL02/405/28 | 4075 | राजकूमार चंद्रशेखर मिश्रा | सीमा देवी |
| 19 | तुळींज-2 | NL02/862/3 | 4077 | प्रेमसिंह जयसिंह सोलंकी | प्रमोद छेदिलाल गुप्ता |
| 20 | तुळींज-2 | NL02/958/53 | 4078 | संजय कृष्णचंद सिंह | संजयकुमार छोटेलाल शुक्ला व प्रवेशकुमार छोटेलाल शुक्ला |

**सही /-**
**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

---

## PRESS TENDER NOTICE

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे**

निविदा सूचना क्र. १० सन २०२३-२४

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय अंतर्गत जल जीवन मिशन अंतर्गत आसनगांव पाणीपुरवठा योजना, योजनेतील जलशुद्धीकरण केंद्राच्या आवारात असलेली बीज वाहिनी स्थलांतरीत करणे या कामाची निविदा सूचना मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे या कामाची अंदाजीत किंमत रु. ७,१९,१९९/- एवढी आहे. सदर निविदा सविस्तर तपशील दि. ०९/ ७० /२०२३ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

दिनांक :- ०९/ ७० /२०२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**

**क्र. जिमाका/ठाणे/जाहि/ २०२३-२४/८७**

## संपादकीय...

# राज्यात दुष्काळ तर जाहीर झाला...



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

दुष्काळ जाहीर करण्यासाठीच्या नियमावली आणि निकषांप्रमाणे ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळी तालुक्यात सरकारच्या काय सवलती असणार हेही जाहीर झालं आहे. महाराष्ट्रातला ना दुष्काळ नवीन आणि ना त्यावरचे उपाय नवीन. सगळे तेच. काहीच वेगळं घडत नाही.

राज्याने मंडळ पातळीवर दुष्काळाचे निकष लावून पाहिले तर याहून अधिक गावं या वर्षीच्या दुष्काळात समाविष्ट होतील. दरवर्षी कुठे ना कुठे कमी पाऊस/अति पाऊस/ आठ-दहा दिवस पूर्ण कोरडं/ कमी अवधीत अतिवृष्टी/तपमान वाढ किंवा तपमान कमी या अशा निसर्गाच्या लहरीवरच कोरडवाहू शेती वर्षानुवर्ष चालू आहे. कमी होत जाणारी उत्पादकता आणि निसगार्तील बदलांचे तीव्र झालेले चढउतार याने पिचलेला कोरडवाहू शेतकरी या सगळ्यामुळे आणखीनच खचून जात आहे.

महाराष्ट्रातील जनतेने पहिला प्रश्न विचारायला पाहिजे तो असा की, दुष्काळी परिस्थिती कोणाच्या हातात नाही, पण त्याचे विपरीत परिणाम कमी करण्याचे धोरण अशक्य आहे का? खरं तर तसं ते कधीच नव्हतं. मुद्दा असा आहे की प्रत्येक दुष्काळाच्या वर्षी चारा छावण्या, पाण्याचे टँकर यावर जेवढा खर्च होतो त्यापेक्षा कमी निधी वापरून दुष्काळावर कायमस्वरूपी योजना शक्य नाही का? उदाहरणार्थ, गावोगावी स्थानिक चारा प्रजातीचं संगोपन, संवर्धन करणं, जंगलातल्या चाऱ्याचं उत्पादन वाढवणे हे शक्य नाही का? चारा छावण्यांबाबत जी तत्परता आहे ती कुरण व्यवस्थापनाबाबत का नसावी?

दुसरा प्रश्न पिण्याचं पाणी. एखाद्या वर्षी नेहमीपेक्षा थोडा कमी पाऊस झाला तरी लगेच पाणीकपातीची चर्चा सुरू होते. टँकरने सुरू होणाऱ्या पाणीपुरवठयाची आकडेवारी समोर येते. टँकरभोवती किंवा विहिरीभोवती जमलेल्या गावकऱ्यांचे फोटो दाखवून याची चर्चा माध्यमांमध्ये सुरू होते. हे असं घडण्यात काही लाजिरवाणं आहे असं आपल्याला का नाही वाटत? पाणलोट विकासाचा रस्ता महाराष्ट्राने दाखवला, इतर राज्यांतील गावच्या गावं पिण्याचं पाणीच नव्हे तर या पद्धतीने पाण्याचं संवर्धन करून रब्बी शेतीदेखील करायला लागली. पण आपण मात्र पाणलोटात यशस्वी झालेल्या फक्त एक आणि दोन लहान गावांची (ती गावं ग्रामपंचायत असलेलीदेखील नाहीत) नावं घेण्यात समाधान मानतो.

इथंसुद्धा टँकरवरचा खर्च आणि जलसंवर्धनाचा खर्च यांत तफावत आहेच. असंही लक्षात घ्यायला हवं की चारा छावणी आणि टँकरवरचा खर्च हा प्रत्यक्षात काही ‘निर्माण’ करत नाही. तो निव्वळ खर्च आहे. पण कुरण व्यवस्थापन आणि जलसंवर्धनाचा खर्च हे गावाच्या विकासातले महत्त्वाचे घटक आहेत.

विविध प्रकारची जल मिशन, जल व्यवस्थापनाच्या योजना यशस्वी झालेल्या गावांतून तरी पाण्याचे टँकर्स लागत नाहीत असं घडतंय का? आमच्या संस्थेच्या (प्रगती अभियान) अनुभवातून हे सिद्ध झालं आहे की मनरेगाचं व्यवस्थापन चोख असेल तरी गावागावांतल्या पाण्याची समस्या नक्कीच दूर होऊ शकते. पण यासाठी पाणलोट पद्धतीवर आधारित व्यवस्थित नियोजन करणं आवश्यक आहे.

दुष्काळाच्या संदर्भातला तिसरा महत्त्वाचा प्रश्न आहे पीक विम्याचा. पीक विम्याचा जाहीर झालेला निकष आणि नियमावलीनुसार दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झाली तर विम्याची रक्कम देय आहे. या खरिपात ही परिस्थिती अनेक गावांत ओढवलेली होती. कोणत्याही नैसर्गिक कारणाने उत्पादन ‘उंबरठा’ उत्पन्नापेक्षा कमी झालं तर विम्याची रक्कम त्या क्षेत्रातल्या सर्वांनाच देय आहे. पण यातलं उत्पन्न मोजण्याची पद्धतच अव्यवहार्य आहे आणि उत्पादन आल्यानंतर ठरलेल्या काळात तर ती मोजणी होणं जवळजवळ शक्य नाही. या दोन समस्यांवर ठोस उपाय शोधण्याचं आव्हान आपल्यासमोर आहे. मग पीक विमा योजना कागदावरच राहते. जलसंधारणाद्वारे पाण्याची उपलब्धता, चाऱ्याचं नियोजन आणि पीक विम्याचं प्रभावी संरक्षण हे दुष्काळाच्या आजारावरील प्रभावी उपचार आहेत. महाराष्ट्रातला सर्वाधिक शेतकरी आणि शेती ही कोरडवाहू आहे हे ज्ञात असूनही कोरडवाहू शेतीसाठीच्या उपाययोजना काय आहेत? कोरडवाहू शेती करणारं पूर्ण कुटुंब शेतीच्या कामात असतं. ही बहुतेक कुटुंबं अल्पभूधारक, कमी शेतजमीन असलेली आहेत हेही माहीत आहेच.

अशी शेतकरी कुटुंबंही खरिपात शेतीमध्ये दोन-तीन नाही तर सहा-सात पिकं घेऊन आपली जोखीम कमी करत असतात. पावसाळा कसाही गेला तरी काही पिकं चांगलं आणि काही बरं उत्पन्न देतील असं त्यांचं नियोजन असतं. यांत भरडधान्यं, डाळी, तेलबिया अशी पिकं घेऊन घरात पौष्टिक अन्नधान्य मिळतं. अल्पभूधारक, कोरडवाहू शेतीसाठी दुष्काळ हाच तेरावा महिना आहे. पावसाचा भरवसा नाही म्हणून तिथं पाणलोट तत्त्वावर पाण्याचं साठवण वाढवून, पिकांना संरक्षित पाणी देऊन उत्पन्नातली घट कमी होऊ शकते.



# खरं काय आणि खोटं काय?

राज्यासह देशात राजकीय आणि सामाजिक पातळींमधील बदलाचे हिंदोळे पहायला मिळत आहेत. सोशल मीडियाच्या प्रभावाखाली अबालवृद्धांपासून सगळेच आलेले दिसतात. म्हणूनच या हिंदोळ्यांमुळे अनेकांची डोकी गरगरायला लागली आहेत. त्यात आता भर पडली आहे ती, नव्या तंत्रज्ञानाची. हातात स्मार्टफोन येऊन आपण तितके ‘स्मार्ट’ बनलेलो नाहीत, हेच वास्तव आहे. आधीच सर्वसामान्यांची अवस्था ‘अजुर्ना’सारखी झालेली असताना नव्या-नव्या घडामोडींमुळे तो आणखी संभ्रमित होत आहे. टॉलिवूड आणि बॉलिवूड अभिनेत्री रश्मिका मंदाना अलीकडेच एका व्हिडीओमुळे प्रचंड चर्चेत आली होती. हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. या आक्षेपार्ह व्हिडीओमध्ये दिसणारी रश्मिका नसून झारा पटेल नावाची तरुणी असल्याचेही नंतर उघड झाले. त्यापाठोपाठ अभिनेत्री कतरिना कैफ आणि मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांची मुलगी सारा तेंडुलकर यांचीदेखील अशीच एक व्हिडीओ क्लिप व्हायरल झाली. एका पाठोपाठ एक अशा क्लिप व्हायरल होत आहेत. मुळात हे सर्व उद्योग आर्टिफिशल इंटलिजन्स (एआय) या नव्या तंत्रज्ञानाचे आहेत. अशा व्हिडीओंना ‘डीपफेक व्हिडीओ’ म्हटले जाते. डीप लर्निंग आणि फेक या दोन शब्दांपासून हा शब्द तयार झाला आहे. एआयचे अल्गोरिदम आणि मशीन लर्निंग यांचा वापर करून फोटो किंवा व्हिडीओत बदल केला जातो. मशीन लर्निंग टूल हे एआयचे अल्गोरिदमच्या मदतीने चेर्हयाचे स्कॅनिंग करते, त्यातून त्या चेर्हयाची ठेवण आणि हावभाव जाणून घेतली जाते. त्यानंतर ते दुर्सया कोणत्यातरी चेर्हयावर ते लावले जाते. त्यातून असे फोटो आणि व्हिडीओ तयार होतात आणि सोशल मीडियावर व्हायरल होतात.

सुरुवातीच्या काळात आर्टिफिशल इंटेलिजन्सचे कौतुक सर्वत्र झाले, पण कोणत्याही नव्या तंत्रज्ञानाप्रमाणे याचा गैरवापरदेखील होत आहे. बारकाईने बघितल्यावर असे डीपफेक व्हिडीओ किंवा फोटो लगेच ओळखता येतील. त्या व्हिडीओ किंवा फोटोतील प्रकाशाचा फरक, व्हिडीओत दिसर्णाया संबंधित व्यक्तीच्या हालचाली व्यवस्थित बघितल्यास ते फेक असल्याचे लक्षात येऊ शकते. त्याबरोबरच तो व्हिडीओ किंवा फोटो पाठवर्णायाच्या सवयी किंवा पूर्वेइतिहास लक्षात घेणेसुद्धा गरजेचे आहे. जाणूनबुजून फॉर्वर्ड करणारा किंवा जे येईल ते पुढे पाठवायचे, अशी सवय असलेल्यांकडून असे फेक व्हिडीओ किंवा फोटो येण्याची शक्यता अधिक असते. याच्याबरोबरच आपण आपले वैयक्तिक व्हिडीओ तसेच फोटो सोशल मीडियावर शेअर करताना काळजी घेणे आवश्यक आहे. कारण, सेलिब्रिटींचे डीफफेक व्हिडीओ किंवा फोटो तयार केले जातात आणि त्यासाठी ज्या मूळ व्हिडीओ किंवा फोटोचा वापर केला जातो, तो सर्वसामान्यांचाही असू शकतो. मुख्य प्रश्न हा आहे की, असे व्हिडीओ किंवा फोटो तुमच्याकडे आले तर, तुम्ही काय करणार? सोशल मीडिया हे अतिशय प्रभावी माध्यम ठरले आहे, पण त्याच्या आहारी बहुतेकजण गेले आहेत. त्यातही सोशल मीडियावर आलेल्या पोस्टची सत्यता न तपासता, ते फॉर्वर्ड करर्णाया महाभागांची संख्या जास्त आहे. त्यांच्याबरोबरीने त्यावर शाब्दिक खल करणारेदेखील आहेत. यातील खरे काय आणि खोटे काय, याच्याशी या लोकांना काहीही देणेघेणे नसते. ही झाली सामाजिक स्तरावरची फसवणूक.

थेट संवादाचे प्रभावी माध्यम बनलेला मोबाईल ज्याच्या त्याच्या हाती दिसू लागला आणि कालांतराने तो स्मार्टफोन बनला. इंटरनेटचे जाळे आणि नानाविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममुळे जगाच्या या कोर्पयापासून त्या कोर्पयापर्यंत सर्वांना कनेक्ट करणे सुलभ झाले, पण या नव्या तंत्रज्ञानातील बारकावे ओळखण्याइतपत आपण तयार झालो का? तर नाही. आपण मोबाईल आणि त्यातील विविध ॲप्स वापरायला शिकलो, पण ते सावधगिरीने वापरायला शिकलो नाही.

संरक्षण मंत्रालयात प्रमुख सल्लागार म्हणून कार्यरत असणारे निवृत्त लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे यांनी स्मार्टफोनला स्टेनगनची उपमा दिली होती. स्टेनगनमधून एकावेळी गोळ्या सुटण्याला मयार्दा असते, परंतु स्मार्टफोन त्याच्याहूनही धोकादायक आहे. एखादी पोस्ट काही सेकंदात व्हायरल होते आणि त्याचे पडसाद लगेचच उमटतात. यातील खरे काय आणि खोटे काय? या पोस्टमध्ये असलेला कंटेन्ट कधीचा आहे? तो आपल्या देशाशी संबंधित आहे का? त्याचे पुढे काय झाले? हे त्याच इंटरनेटवरून पडताळण्याचा प्रयत्न केला जात नाही. महत्त्वाचे म्हणजे, ही पोस्ट फॉर्वर्ड केल्यावर काय घडू शकते, याची सामाजिक जाणीव अनेकांना नसते. त्यातूनच काहीतरी विपरीत घडण्याची भीती निर्माण होते. मणिपूर धुमसत राहिले ते सोशल मीडियावरील अशाच पोस्टमुळे.

सोशल मीडियाच्या नादात देशाची सुरक्षितता पणाला लागते, ती वेगळी. सोशल मीडियाचे बहुतांश प्लॅटफॉर्म हे विदेशी आहेत. त्यांना आपण आपला डाटा अर्थात वैयक्तिक माहिती सहज उपलब्ध करून देतो. याशिवाय, सोशल मीडियाच्या माध्यमातून देशातील घडामोडींमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्नही केला जातो. तीन वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला याच प्रकारे हवा दिली होती. त्यावेळी ‘टूलकिट’ प्रकरण समोर आले होते. तंत्रज्ञानाचा हा धोका आर्टिफिशल इंटेलिजन्सच्या निमित्ताने नव्याने निर्माण झाला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची संभ्रमित अवस्था आणखी वाढून, खरे काय आणि खोटे काय? हा प्रश्न आणखी गहन बनला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, फसगत करणारे इंटेलिजन्स केवळ आर्टिफिशलच असते असे नव्हे, तर ते ह्युमन अधिक असते. आर्टिफिशल इंटेलिजन्स वापरणारी बुद्धीदेखील मानवीच असते आणि ही मानवी बुद्धी समोरच्याची फसवणूक करण्यासाठी नवनव्या क्लुप्त्या शोधतच असते. कधी एखादी लोभसवाणी स्कीम घेऊन, एखादे पेमेन्ट केले नसल्याचे सांगत, एखाद्या गोष्टीची केवायसी बाकी असल्याची सबब देत, तुमच्या क्रेडिट अथवा डेबिटकार्डचे व्हेरिफिकेशन करायचे असल्याचे सांगत सर्वसामान्यांना फसवणुकीच्या जाळ्यात ओढले जाते. त्यातील कॉल्स किती खरे आणि किती खोटे? हे सुद्धा इंटेलिजन्सच आहे.

आपला नंबर या सर्वांना मिळतो कसा? त्यातही आपण फसवले गेलो असतो. कुरिअर घेताना, सुपरमार्केट तसेच मेडिकल स्टोअरमध्ये बिल बनवताना अशा अनेक वेळा आपण अनाहूतपणे आपला नंबर शेअर करत असतो आणि हाच मोठा व्यवसाय बनला आहे. वस्तुतः याला मनाई करता आली पाहिजे. पूर्वी मोबाईल नव्हता, तेव्हाही आपण कुरिअर स्वीकारत होतो, औषधे विकत घेत होतो, किराणा वस्तू विकत घेत होतो, मग आताच नंबर कशासाठी पाहिजे? हा प्रश्न कोणालाही पडत नाही. म्हणूनच, सातत्याने येर्णाया अशा फोन कॉल्स आणि मेसेजेसनी आपण हैराण होतो. नंबर ब्लॉक तरी किती करणार?

हे झाले आर्थिक फसवणुकीचे, राजकीय फसवणूक तर परंपरागत चालत आली आहे. लोकांना हातोहात फसवण्याची चलाखी या राजकारण्यांकडे असते. एखादा वाद निर्माण करायचा किंवा एखाद्या प्रश्नाचे घोंगडे भिजत ठेवायचे आणि वेळोवेळी त्याला हवा देत राहायचे, यात या राजकारण्यांचा हातखंडा असतो. त्यांचे यात व्यवस्थित चाललेले असते. भरडला जातो तो सामान्य नागरिकच. इतकी आश्वासने देऊन आणि विकासाचे इतके दावे करून आपण कोठे आहोत? आपल्या सभोवतालीचे प्रश्न तेच आहेत. आपली दिनचर्या तीच आहे. काय बदल झाला. गुलजारलिखित आणि दिग्दर्शित 1971 सालच्या मेरे अपने चित्रपटातील एक संवाद आताही चपखल बसतो. त्यात मेहमूद (अनोखेलाल) हा शत्रुघ्न सिन्हाला (छेनू) देशातील सत्तांतराचा इतिहास समजावून सांगतो. राजे-महाराजांना जहागीरदारांनी हटवले. जहागीरदारांना भांडवलदारांनी हटवले आणि आम्ही या भांडवलदारांना हटवले. पण गंमत पहा, जनता जिथे होती तिथेच उभी आहे... असे मेहमूद सांगतो. एकमेकांना शह देत, सरकार खाली खेचत सत्तेत नवनवीन पक्ष येत आहेत, पण आपल्या सर्वांचे प्रश्न तसेच आहेत.

सध्या राज्यात आरक्षणावरून वातावरण तापले आहे. हा मुद्दाही ठराविक काळातच का उपस्थित होतो? हा प्रश्न इतकी वर्षे का तडीस गेला नाही? हे समजू शकलेले नाही. आपण सारे अर्जुन या पुस्तकात प्रसिद्ध लेखक व. पु. काळे म्हणतात - धर्म आणि विज्ञान यांचे मार्ग भिन्न नाहीत. सत्याची प्रचिती जशी धमार्तून येते, तशीच विज्ञानातून येते, अर्थात, धर्म याचा राजकीय पातळीवरचा अर्थ इथे अभिप्रेत नाही. निधर्मीच्या नावाखाली धर्मांधता थयाथया नाचत आहे. राखीव जागा मागासवगीर्यांसाठी हे स्वातंत्र्य मिळाल्यापासून वाचावे लागतेय. हे प्रमाण चौतीस टक्क्यांवरून पन्नास टक्क्यांपर्यंत आले आहे. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षं झाली. मागासवर्ग राहिलाच कसा? राखेतून वर आलेला जपान आज जगावर राज्य करतोय, ते ज्ञानमार्गाच्या आधारावर आणि अथक कष्टावर. एकूणच, या ना त्या माध्यमातून, विविध प्रकारे आपला बुद्धीभेद केला जात आहे आणि आपणही काही वेळेस गाफिल क्षणी त्याला बळी पडतो. त्यात आता आर्टिफिशल इटेलिजन्स या नव्या तंत्रज्ञानाची भर पडली आहे. परिणामी खरं काय आणि खोटं काय? ही संभ्रमावस्था निर्माण होण्याचा आणखी एक मार्ग तयार झाला आहे. तशा अवस्थेत आपण सर्वसामान्य राहतो. पण आता वेळ आली आहे, आपला इंटेलिजन्टपणा दाखवण्याची.

**प्रभाग समिती ' आय' कार्यालय, वसई**
Prabhagsamitie@gmail.com
**ता. वसई, जि.पालघर पिन नं. ४०९ २०९**

**दूरध्वनी : २५०-२३०९०२०/२३२२२५८**
**रुग्णालय : २३२२१२०/२३२३३४३**
**फॅक्स :०२०५-२३२२९२०**
**जा.क्र :वविशम / कर विभाग /वसई/ ३६६९/२३-२४**
**दिनांक : १३/११/२०२३**

**जाहिर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण करणेकामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे प्रभाग समिती - आय कार्यालयात सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कागदपत्रासह नोंदवावी. सदर बाबतीत कोणतीही हरकत/तक्रार न आल्यास कार्यालयामार्फत पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | वसई | VV10/9386 | समसु हुदा शेख | विरेन्द्र पारस वर्मा |
| २ | वसई | VV10/8872 | दिनेश लक्ष्मण साळवी | कृष्णा कमल धौरीया / चंपा कृष्णकमल धौरीया |
| ३ | सांडोर | SD01/264/36 | सतिष ज दत्तानी | सुनील कुमार पराशर |
| ४ | सांडोर | SD03/228/5 | रुब्रोडीन सी डिसोजा | कुतुबूददीन एम आय मुल्ला इब्राहिम अली चोमेवाला शकिना कुतुबूददीन कमरुददीन निमाचवाला |
| ५ | सांडोर | SD01/208 | जॉयसी जेरोन व जेसेफ एस रुमाव | एवान्स जेरोम रुमाव |
| ६ | सांडोर | SD01/243/39 | स्टार बिल्डर्स | ॲसोल्टीना रुफिन रिबेलो |
| ७ | सांडोर | SD01/243/38 | स्टार बिल्डर्स | कॅरोलीन एलायस ग्रेशस |
| ८ | सांडोर | SD01/243/59 | स्टार बिल्डर्स | आयरीन एलायस ग्रेशस |
| ९ | सांडोर | SD01/171/77 | मॅक्सी असीसो लुईस | सुनीता वाईफ ऑफ शंभुलाल आमेटा |
| १० | कौलार खुर्द | KK01/13312 | सिझर लिना फ्रान्सीस नुनिस | सिझर फ्रान्सीस नुनिस |
| ११ | वसई | VV19/15692 | सामंत भारती | अश्विन अरुण सामंत |
| १२ | वसई | VV15/4540 | धनंजय तात्याजी राऊत | अरशद अल्लाहबक्ष शेख / अशरफ अल्लाहबक्ष शेख |
| १३ | वसई | VV19/7832 | मंदाकिनी नारायण मोरे | योगिनी नारायण मोरे |
| १४ | वसई | VV21/12324 | राधेश्याम कांदु | निकेश रामचंद्र उबाळे/ नयना निकेश उबाळे |
| १५ | वसई | VV16/5847 | महमद रईस महमद सादीक अमरोही | शकील अहमद महम्मद रईस |
| १६ | वसई | VV16/17809 | महमद रईस महमद सादीक अमरोही | शकील अहमद महम्मद रईस |
| १७ | वसई | VV03/19997/6 | महालक्ष्मी वेनचर्स | जया धनंजय म्हात्रे |
| १८ | वसई | VV11/8199 | मोजेस खुबरी | रेजीना मोजेस कोळी |
|  | वसई | VV08/4382 | सुभाष सोनुबापु काटकर | प्रकाश सोनाबापु उर्फ सोनुबापु काटकर |
| २० | वसई | VV19/19918/7 | ओजस बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स | वसई जनता सहकारी बँक लि. |
| २१ | वसई | VV10/18513 (शुध्दीपत्र) | किशोर देविदास मोहिते व जागृती किशोर मोहिते | कैलाश राजाराम मोरे व निता कैलाश मोरे |
| २२ | वसई | VV19/1146 | शालिनी डि. चौधरी | सलोमी रॉजर सिरेजो व प्रियदर्शनी केविन डायस |

**सहो/-**
**प्र.सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती 'आय'**
**बसई-विरार शहर महानगरपालिका**

# समाजसुधारक राजारामशास्त्री भागवत




राजारामशास्त्री भागवत हे प्रख्यात विद्वान आणि समाजसुधारक होते. भाषाशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र व्युत्पत्ती, इतिहाससंशोधन, धर्मसुधारणा, वेद-पुराणे, स्मृती वगैरेंची चिकित्सा इत्यादी ज्ञानाच्या क्षेत्रांमधील मोठे प्रज्ञावंत होते. त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८५१ रोजी रत्नागिरीतील कशेळी येथे झाला. राजारामशास्त्री १८६७ मध्ये मॅट्रिक झाले. वडिलांच्या इच्छेनुसार त्यांचे ग्रँट मेडिकल कॉलेजात ३ वर्षे शिक्षण झाले. नंतर वडिलांच्या मृत्यूमुळे हे शिक्षण थांबले. एका संस्कृत पंडिताकडे अध्ययन करून ते शास्त्री झाले. नंतर रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये १८७५ साली ते शिक्षक झाले. नंतर ते सेंट झेव्हिअर कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून शेवटपर्यंत होते. १९०२ मध्ये मुंबई विद्यापीठात विल्सनफायलॉलॉजिकल लेक्चरर म्हणून त्यांची निवड झाली.

शिक्षणविषयक स्वतंत्र ध्येये असल्यामुळे त्यांनी १८८४ साली बाँबे हायस्कूल व पुढे स्वावलंबनाने मराठा हायस्कूल काढले. महर्षी कर्वे, रँ. परांजपे, बॅ, जयकर वगैरे अनेक नामवंत त्यांचे विद्यार्थी होते. भागवत लोकशिक्षक होते. पाश्चात्त्य व पौर्वात्य विविध भाषांचा सखोल अभ्यास शक्य व्हावा म्हणून लॅटिन, ग्रीक, अरबी, फार्सी वगैरे भाषा ते शिकले. अस्पृश्यता निवारणाकडेही त्यांनी सक्रिय लक्ष दिले.

दीनबंधु या सत्यशोधक मुखपत्रात जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी अनेक वादळी लेख लिहिले. लोकहितवादींच्या धारदार शतपत्रांत त्यांनी भरच घातली. जोतीराव फुले व राजारामशास्त्री यांच्या काही प्रतिपादनात व कृतींत साम्य आढळते. स्त्रियांची सुधारणा व सुशिक्षण यासंबंधानेही शास्त्रीबोवांनी प्रयत्न केले. संस्कृतचे विद्वान असूनही त्यांना मराठी बोलीभाषेचा विलक्षण अभिमान होता. अशा या प्रख्यात विद्वानाचे ४ जानेवारी १९०८ रोजी निधन झाले.

## ठाण्यात उद्धव ठाकरेंचे ९० टक्के बॅनर्स फाडले



**■ठाणे ।प्रतिनिधी,**

शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांनी सुरू केलेल्या मुंब्रा येथील शिवसेना मध्यवर्ती शाखेवरून शिंदे आणि ठाकरे गटात वाद झाला होता. या वादातून शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी जेसीबीच्या साहाय्याने शाखा जमीनदोस्त केली होती. तसेच, शिंदे गटाने नव्याने शाखा बनविण्यासाठी मंगळवारी भूमिपूजन केले होते. शनिवारी, (११ नोव्हेंबर) उद्धव ठाकरे जमीनदोस्त केलेल्या शाखेच्या ठिकाणी भेट देणार आहेत. त्यापूर्वीच ठाण्यातील वातावरण तापलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उद्धव ठाकरे यांच्या स्वागतासाठी मुंब्रा ते ठाणे या भागात बॅनर लावले होते. त्यातील ९० टक्के बॅनर फाडल्याचा आरोप जितेंद्र आव्हाडांनी केला आहे. जितेंद्र आव्हाडांनी याचा एक व्हिडीओ 'एक्स' (ट्वीटर) अकाउंटवर शेअर केला आहे.

जितेंद्र म्हणाले, ''मी स्वतः मुंब्रा पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ निरीक्षकांना भ्रमण ध्वनिवरून संपर्क करुन, शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वागतासाठी मुंब्रा ते ठाणे या भागात लावलेले होर्डिंग्ज फाडण्यात येतील, अशी शंका व्यक्त केली होती. यावर त्यांनी, 'असे काहीही होणार नाही. आपण निश्चिंत रहा. आमची सर्वत्र नजर आहे' असं मला मोठ्या आत्मविश्वासाने सांगितलं होते.''

''आज उद्धव ठाकरेंचा ठाण्यात कार्यक्रम होणार आहे. त्यानिमित्ताने कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने बॅनर शहरात लावलेले होते. यातील ९० टक्के बॅनर आता फाडण्यात आले आहेत. मागील वर्षभरात आम्हाला असे अनेक अनुभव आलेले आहेत. एक बॅनर फाडायला किमान १५ मिनिट तरी लागतात आणि 'सर्वत्र नजर असणाऱ्या' पोलिसांच्या मदतीशिवाय हे होऊच शकत नाही.

आता पोलीस मला म्हणत आहेत की, 'उद्धव साहेबांना आम्ही मुंब्र्यात येऊच देणार नाहीत..!,''' असं जितेंद्र आव्हाडांनी सांगितलं.

''असो, तरीदेखील मी मुंब्रा पोलीस स्टेशन आणि ठाणे पोलिसांचे आभार मानतो. ते 'त्यांची ड्युटी' मोठ्या निष्ठेने करत आहेत. 'मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है, वही होता है, जो मंजुरे खुदा होता हैं..!,''' अशी शायरी जितेंद्र आव्हाडांनी केली आहे.

## '...तर मराठी माणसाला पंतप्रधान करा', भाजपाला संतापलेल्या मनसेचं चॅलेंज

**■मुंबई । प्रतिनिधी,**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये 2 दिवसांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दिपोत्सव 2023 चं उद्घाटन झालं. सलीम खान आणि जावेद अख्तर म्हणजेच बॉलिवूडमधील प्रसिद्ध सलमी-जावेद या जोडीबरोबर अभिनेता रितेश देशमुख आणि दिग्दर्शक आशितोष गोवारीकर यासारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. मात्र या सोहळ्यावरुन मनसेच्या मराठी प्रेमाबद्दल भाजपाने सवाल उपस्थित केला आहे. भाजपाने केलेल्या या टीकेवरुन मनसेनं भाजपाला थेट मराठी मणसाला पंतप्रधान करण्याचं आव्हान दिलं आहे. भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी भाजपाने आयोजित केलेल्या दिपोत्सवामध्ये मनसेचा थेट उल्लेख न करता



मनसेच्या दिपोत्सवातील मान्यवरांचा उल्लेख करत टीका केली. काल एका दिपोत्सवाचं उद्घाटन झालं. आदपूर्वक नाव घ्यायचं झालं तरी सलीम खान आणि जावेद अख्तर यांच्या उपस्थितीत झालं. आम्ही करतोय उत्तरा केळकर यांच्या उपस्थितीमध्ये. आता मराठीचा प्रश्न कोणी कोणाला विचारायचा हा प्रश्न आहे. आता काल करणाऱ्यांनी त्यांची टीमकी वाजवून घेतली सलमी-जावेदला घेऊन. ते मोठे असतील आणि आहेत पण आमचे मराठी कलाकार छोटे नाहीत ओ, असं आशिष शेलार भाजपाच्या दिपोत्सवामध्ये म्हणाले. मनसेवर करण्यात आलेल्या या टीकेला मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी शेलक्या शब्दांमध्ये उत्तर दिलं आहे. मनसेनं दिपोत्सव साजरा केला. मराठी कलाकार, अभिनेत्यांना विसारले अशी टीका आशिष शेलार यांनी केली आहे, असं म्हणत देशपांडेना पत्रकारांनी प्रश्न विचारला. या प्रश्नाला उत्तर देताना संदीप देशपांडेंनी थेट मराठी माणसाला पंतप्रधान करावं अशी मागणी करण्याची हिंमत करावी असं म्हटलं आहे. आशिष शेलार यांचं मराठीबद्दलचं प्रेम हे पुतण्या मावशीचं प्रेम आहे. एवढा जर मराठी माणसाबद्दल प्रेम असेल, पुळका असेल तर गुजराती माणसाऐवजी मराठी माणसाला पंतप्रधान करा. बघू आशिष शेलारांची कधी हिंमत होते का हे वाक्य बोलायची. जेव्हा मराठी कलाकारांवर अन्याय होतो. जेव्हा त्यांना थेअटर मिळत नाही तेव्हा त्यांच्या पाठीशी कोण उभं राहतं आणि कोण पार्श्वभागाला पाय लावून पळतं हे अख्ख्या महाराष्ट्राला माहिती आहे. आशिष शेलारांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा, असं संदीप देशपांडे म्हणाले. सलीम-जावेद यांना दिपोत्सवासाठी बोलवल्याने मनसेला ट्रोल केलं जात आहे.

## शरद पवारांची प्रकृती बिघडल्याने तातडीने तपासणी, डॉक्टरांनी दिला महत्त्वाचा सल्ला

**■मुंबई । प्रतिनिधी,**

शरद पवार यांना अस्वस्थ वाटू लागल्याने डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली आणि त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे. आता त्यांची प्रकृती ठीक आहे ते उद्या घरी राहून लोकांना भेटतील. बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली ॲग्री कल्चर आणि विद्या प्रतिष्ठान अशा दोन बैठकींचं आयोजन करण्यात आलं होतं. दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान शरद पवार यांना अस्वस्थ वाटू लागलं. त्यावेळी खासदार आणि शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे यांनी डॉक्टरांची टीम बोलवली. डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. त्यानंतर शरद पवारांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला आहे. शरद पवार दिल्लीत राहून आले असल्याने त्यांना त्रास जाणवला.



डॉक्टरांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला आहे. त्यानुसार ते आराम करणार आहेत. दिवाळी निमित्त संपूर्ण पवार कुटुंब बारामतीत आले आहे. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास शरद पवार ॲग्रीकल्चर ट्रस्ट या ठिकाणी शरद पवार उपस्थित होते. त्यानंतर दुपारी २ च्या सुमारास शरद पवार विद्यानगरी या ठिकाणी गेले असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागलं. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी तातडीने डॉक्टरांना बोलवून शरद पवारांची वैद्यकीय तपासणी केली. यावेळी ईसीजीही काढण्यात आला.

डॉक्टरांनी शरद पवार यांना विश्रांतीचा सल्ला दिल्याने त्यांचा पुरंदर दौरा रद्द झाला आहे. मात्र त्यांची प्रकृती ठीक असल्याने उद्या ते घराबाहेर पडणार नसले तरीही त्यांचे सगळे कार्यक्रम होणार आहेत. लोकांना ते घरी राहून भेटणार आहेत. शरद पवार यांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ही माहिती दिली. शरद पवारांची प्रकृती बिघडली त्यामुळे डॉक्टर अँब्युलन्सही घेऊन आले होते.

शरद पवार यांचं वय ८३ झालं आहे. तरीही त्यांचा उत्साह हा तरुणांनाही लाजवेल असा आहे. दिवाळी असल्याने बारामती या ठिकाणी त्यांच्या निवासस्थानी शरद पवार आहेत. दिवाळी सण हा दरवर्षी सगळे पवार कुटुंब एकत्र घालवत असतात. विशेष बाब म्हणजे याच वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. तरीही अजित पवार यांनी शरद पवार यांची शुक्रवारी भेट घेतली. मात्र आज शरद पवार यांना विद्या प्रतिष्ठानच्या बैठकीत थोडा त्रास जाणवू लागला.

त्यामुळे त्यांची डॉक्टरांकडून तातडीने तपासणी करण्यात आली. डॉक्टरांनी शरद पवार यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. आता त्यांची प्रकृती ठीक असून रविवारी ते घरीच असणार आहेत आणि ठरल्याप्रमाणे लोकांची भेट घेणार आहेत.

## मुंबईच्या प्रवेशद्वारावरील खारघर टोलनाक्यावर वाहनांवर पाण्याचा मारा सुरू



**■पनवेल। प्रतिनिधी,**

हवेतील वायु गुणवत्ता निदेर्शांक चढा न राहता धुलीकणाची मात्रा कमी करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांनी पनवेल महापालिकेला दिलेल्या आदेशानंतर काही तासातच पनवेल शीव महामार्गावरील खारघर टोलनाक्यावर पालिकेने वाहनांवर पाण्याचा मारा करणारी यंत्रणा कार्यान्वित केली. पहिल्यांदाच केलेल्या या प्रयोगामध्ये एका तासात साडेतीनशेहून अधिक वाहनांवर हा पाणी मारा शुक्रवारी सायंकाळपासून सुरू झाल्याने आता तरी हवेतील प्रदूषण कमी होईल अशी अपेक्षा आहे. पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी तातडीने याबाबतची उपाययोजना करण्याचे आदेश दिल्यानंतर काही तासांत पालिका प्रशासनाने खारघर टोलनाक्यावर पाण्याच्या टाकी व इतर यंत्रणा येथे कार्यान्वित केली. पाण्याची टाकी १० हजार लीटरची येथे बसविण्यात आली असून एकावेळी १२ नोझल टोलनाक्यावर सुरू आहेत. तसेच एका टाकीतील पाणी २ तासांत संपल्यानतंर पुन्हा नव्याने टाकी भरली जाते. तासाला ३०० ते ३५० गाड्यांवर हा पाणीमारा केला जात असल्याची माहिती आयुक्त देशमुख यांनी दिली. स्वतः आयुक्तांनी ही यंत्रणा व्यवस्थित चालविली जाते का, याचा आढावा घेतला. यासाठी लागणारे पाणी सध्या पालिका कोपरा तलावातून आणले जात आहे. २४ तास ही यंत्रणा सुरू ठेवण्यात येणार आहे. यासाठी १२ ते १५ टँकर पाणी लागेल असे नियोजन पालिकेने केले आहे. हा पाण्याचा मारा पुढील पाच ते सहा दिवस सुरू राहणार आहे. वाहनांवर पाणी माऱ्याचा प्रयोग पहिल्यांदाच राष्ट्रीय महामार्गावर केला जात आहे. यामुळे मुंबईमध्ये प्रवेश करणाऱ्या वाहनांवरील माती व धूळ कमी होऊन मुंबई शहरातील हवेतील धूलिकण कमी होण्यास मदत होणार आहे.

## शहर परिसर कोंडीच्या विळख्यात
## कल्याण पालिका मुख्यालयाला विक्रेत्यांचा विळखा



**■कल्याण ।प्रतिनिधी,**

मागील काही दिवसांपासून कल्याण शहरातील सर्व वर्दळीचे रस्ते वाहन कोंडीच्या विळख्यात अडकत आहेत. शिवाजी चौकातून वाहनासह बाहेर पडताना अनेक वेळा पाऊण तास रखडपट्टी करावी लागत आहे. या सगळ्या प्रकाराने प्रवासी हैराण आहेत.

शिवाजी चौक हा कोंडीचा मुख्य केंद्रबिंदू झाला आहे. याठिकाणची वाहतूक सुरळीत करण्याच्या कोणत्याच उपाययोजना नसल्याने पालिका, वाहतूक पोलीस प्रशासन हतबल आहे. शिवाजी चौकातून भिवंडी, शिळफाटा दिशेने येजा करणारी वाहने धावतात. पारनाका, बाजारपेठ भागातून येऊन मुरबाड रस्ता, पत्रीपुलाकडे जाणारी वाहने एकाचवेळी शिवाजी चौकात येतात. त्याचवेळी कल्याण रेल्वे स्थानकाकडून खडकपाडा, काळा तलाव, लालचौकी, आधारवाडी भागात जाणारी वाहने पुष्पराज हॉटेल महमद अली रस्त्यावरून शिवाजी चौकातून इच्छित स्थळी जातात. एकावेळी ही वाहने आडवीतिडवी शिवाजी चौकात घुसत असल्याने वाहतूक पोलिसांची कोंडी सोडविताना दमछाक होत आहे.

दिवाळीनिमित्त भिवंडी, शहापूर, मुरबाड, कल्याण ग्रामीण भागातील नागरिक मोठी बाजारपेठ म्हणून कल्याणमध्ये खरेदीसाठी वाहनासह येतो. ही वाहने रस्त्याच्या कडेला वाहतुकीला अडथळा होईल अशा पध्दतीने उभी केली जात आहेत. त्यामुळे वाहतूक पोलिसांची अशा वाहनांवर कारवाई करताना दमछाक होत आहे. शिवाजी चौकात दोन वाहतूक सेवक, दोन वाहतूक पोलीस असतात. या कर्मचाऱ्यांना चौकातील वाहतुकीचे नियोजन करणे अवघड होत आहे. या चौकात चार वाहतूक पोलीस, दोन वाहतूक पोलीस तैनात करावेत, अशी प्रवाशांची मागणी आहे. शिवाजी चौकातील कोंडीतून मुक्तता झाली की मात्र बाजारपेठ, सहजानंद चौकातून वाहने सुसाट पुढील प्रवासासाठी निघतात. शिवाजी चौकातील कोंडीमुळे शंकरराव चौक, पारनाका भागाकडे जाणारे रस्ते कोंडीत अडकतात.मागील काही दिवसांपासून हा प्रकार सुरू आहे. पालिका मुख्यालयांसमोरील रस्ते कोंडीत अडकत असल्याने पालिका कर्मचारी, अधिकारी वर्गाला त्याचे चटके बसत आहेत.

एका वाहतूक पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, दिवाळीच्या सणामुळे रस्ते, पदपथ अडवून विक्रेते बसत आहेत. कल्याण शहराच्या विविध भागातून नागरिक खरेदीसाठी येत आहेत. त्यांची वाहने वाहनतळा अभावी रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवली जातात. शिवाजी चौकात वाहतूक पोलीस, सेवक तैनात असतात. या चौकाच्या रूंदीकरणाच्या तुलनेत वाहनांचे प्रमाण पाच पट असल्याने या भागात कोंडी होत आहे. शिवाजी चौकातील कोंडीमुळे पादचाऱ्यांना या कोंडीतून मार्ग काढत जावे लागते. या कोंडीचा फटका मुरबाड रस्ता भागाला बसत आहे.

## मुंबईची दिल्ली होऊ देऊ नका उच्च न्यायालयाची टिप्पणी, फटाक्यांच्या कालावधीत एक तासाने घट

**■मुंबई । प्रतिनिधी,**

अवचित पडलेल्या पावसाने हवेचा दर्जा सुधारला, त्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे, पावसाचे आभार माना, असा टोला मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी लगावला. त्याचबरोबर हवा प्रदूषणाच्या बाबतीत दिल्लीकर होण्याऐवजी मुंबईकर च राहू या, अशी टिप्पणी करीत खंडपीठाने फटाके वाजवण्याचा कालावधी आणखी एक तासाने घटवण्याचा निर्णय जाहीर केला. प्रदूषण कमी झाले असले तरी काही भागांत हवेचा दर्जा वाईट असून परिस्थिती अद्यापही गंभीरच आहे, असे स्पष्ट करून फटाके वाजवण्याचा कालावधी आणखी एका तासाने कमी करण्यात येत असल्याचा निर्णय न्यायालयाने दिला. त्यामुळे, मुंबई महानगर प्रदेशात दिवाळीच्या काळात सायंकाळी ७



ते रात्री १० ऐवजी, रात्री ८ ते १० या वेळेतच फटाके वाजवण्याची परवानगी असेल. मुंबईत फटाके वाजवण्याचे प्रमाण कमी होत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. हवा प्रदूषणाच्या बाबतीत दिल्लीकर होण्याऐवजी मुंबईकरच राहू या, अशी टिप्पणीही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या विशेष खंडपीठाने केली. दिवसेंदिवस खालावणारा हवेचा दर्जा लक्षात घेऊन मुंबई आणि मुंबई महानगरप्रदेशात दिवाळीच्या काळात सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत फटाके वाजवण्यासाठी न्यायालयाने गेल्या आठवडयात परवानगी दिली होती. मात्र, शुक्रवारी न्यायालयाने परिस्थिती म्हणावी तशी सुधारलेली नसल्याचे नमूद करून ही वेळ एक तासाने कमी केली. सध्या आपण एका आपत्कालिन आणि गंभीर स्थितीत राहत आहोत. ही स्थिती सुधारण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. परंतु हे राज्य सरकार आणि महापालिकेचे कर्तव्य आहे. हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करून सरकार आणि महापालिका कोणावर उपकार करत नाही, असा टोलाही न्यायालयाने लगावला.

सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण देशात रासायनिक फटाक्यांच्या वापरावर बंदी घातली असून त्याचे पालन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य असल्याचे न्यायालयाने नमूद केले. एवढयावरच न थांबता, उत्पादन स्तरावरच किंवा बाजारात हे फटाके विकले जातात तेव्हा ते तपासण्याची यंत्रणा आहे का? अशी विचारणाही न्यायालयाने केली.

तज्ञ समिती नियुक्त

वायू प्रदूषणाची समस्या केवळ या वर्षभरापुरती मर्यादित नाही, ती पुन्हा उद्भवणार असल्याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. गेल्या काही दिवसांपासून श्वसन विकारांनी त्रस्त रुग्णांनी रुग्णालये भरली आहेत. त्यामुळे, प्रदूषणाचे नेमके स्वरूप काय आहे, याचा अभ्यास करण्यात आला आहे का? हवेत फक्त धूळ आहे की त्यात काही रासायनिक घटकही आहेत, याचा अभ्यास करणे गरजेचे आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, प्रदूषणाचे स्त्रोत शोधून त्याचा अभ्यास करण्यासाठी न्यायालयाने तज्ज्ञांची समितीही नेमली.

महापालिकेच्या निष्क्रियतेवर ताशेरे

मुंबई : गेल्या वर्षीपासून हवेच्या प्रदूषणाच्या समस्येला मुंबईकर सामोरे जात आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी मार्चमध्ये मुंबई महापालिकेने नियम केले होते. या समस्येची तीव्रता वाढत जाणार हे तेव्हापासून माहीत होते, तरीही पालिका प्रशासनाने काहीच केले नाही, अशा शब्दांच उच्च न्यायालयाने शुक्रवारी महापालिकेच्या निष्क्रियतेवर ताशेरे ओढले.

## कांदिवली पश्चिममध्ये साडेतीन लाखांचा भेसळयुक्त मावा जप्त

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दिवाळीनिमित्त नागरिकांना सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने मागील काही दिवसांपासून भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार कांदिवली पश्चिमेकडील धानुकावाडी येथील मेसर्स गुलाब फूड प्रोडक्ट्स या आस्थापनेवर गुरुवारी छापा घालण्यात आला. या छाप्यामध्ये सुमारे साडेतीन लाख रुपये किंमतीचा भेसळयुक्त मावा जप्त करण्यात आला. दिवाळीमध्ये मिठाईला प्रचंड मागणी असते. ही संधी साधून मिठाई व दुग्धजन्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ करण्यात येते. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असते. नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी व दिवाळी आंनदात व उत्साहात साजरी व्हावी



यासाठी अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम हाती घेतली आहे. मागील काही दिवसांपासून विविध ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त पदार्थ जप्त करण्यात येत आहेत. कांदिवली (प.) येथील धानुकावाडी परिसरातील रेणुका नगरमधील जय भारत सोसायटीतील मेसर्स गुलाब फूड प्रोडक्ट्स या आस्थापनेवर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये दुकानातील निकृष्ट दर्जाचा मावा अस्वच्छ आणि सामान्य तापमानाला साठवण्यात आल्याचे आढळून आले. त्यामुळे या दुकानामधील ३ लाख ५९ हजार ६०० रुपये किंमतीचा ८९९ किलो मावा जप्त करण्यात आला. तसेच दुकानामधील रोझ बर्फी, मलाई बर्फी आणि माव्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासनाचे अतिरिक्त आयुक्त शैलेंद्र आढाव आणि सहाय्यक आयुक्त पी. ए. विशे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी टी. बी. घुमरे आणि एस. एस. खांडेकर यांनी ही कारवाई केली.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898